# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

जा.क्र. २३७/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ०७/०५/२०१८

**१) सोन्या चांदीचे दागीणे व नगदी पैश्याची चोरी. :--**

दिनांक ०६/०५/२०१८ चे ०१.०० ते ०३.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादी देवचंद शंकर जांभुळकर वय ५५ वर्ष, रा. चपराळा हा आपले परिवारासह दाराला कुलुप लावुन स्लॅपवर झोपले असता कोणीतरी अज्ञात आरोपीने कुणीही नसल्याची संधी साधुन समोरील दाराचा कुलुप तोडुन घरात प्रवेश करुन सोन्याची नथ ०२.६०० ग्रॅम, गळयातील सोन्याची गाठी ७ ग्रॅम, कानातील खडे ३ ग्रॅम, दोन नग चांदीच्या पायपट्टया, ८० ग्रॅम, १ चांदीचा छल्ला २० ग्रॅम व नगदी ३०,०००/--रु. फुलपॅन्ट चे खिश्यातील ४,०००/--रु. असा एकुण ६१,१००/--रु. चा माल चोरुन नेल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखांदुर येथे कलम ४५७,३८० भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोनी. बन्सोडे पोलीस स्टेशन लाखांदुर हे करीत आहेत.

**२) सोन्या चांदीचे दागीणे व नगदी पैश्याची चोरी . :--**

दिनांक ०१+०२/०५/२०१८ चे रात्र दरम्यान यातील फिर्यादी याचे स्वत:चे मुलीचे लग्न कार्यक्रम लखनौ येथे दिनांक ३/०५/२०१८ रोजी होते लग्न कार्यक्रमास कुटुबांसह घराचे समोरील दाराला कुलुप लावुन गेले असता कोणीतरी अज्ञात आरोपीने कुणीही नसल्याची संधी साधुन घराचे समोरील दाराचा ताला तोडुन आत प्रवेश करुन बेडरुम मधील कपाटातील नगदी किंमती २०,०००/--रु. सोन्याचे टॉप्स ०५ ग्रॅम, किंमती १०,०००/--रु. चांदीचे ५ सिक्के किंमती ३००/--रु. ०५ /--रु. चिल्लर सिक्के किंमती ३००/--रु. १०रु /-- चे चिल्लर सिक्के किंमती १०००/--रु असा एकुण ३१,६००/--रु. चा माल चोरुन नेल्याने फिर्यादी डॉ. चंद्रशेखर तेजराम भोयर वय ६० वर्ष, रा. शिवनगर तुमसर यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम ४५७,३८० भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. उबाळे पोलीस स्टेशन तुमसर हे करीत आहेत.

**३) सोन्या चांदीचे दागीणे व नगदी पैश्याची चोरी . :--**

दिनांक ०५/०५/२०१८ चे १०.०० वा ते ०६/०५/२०१८ चे १२.३० वाजता दरम्यान यातील फिर्यादी हा आपले परिवारासह दिनांक ०५/०५/२०१८ चे १०.०० वा बैतुल म. प्र. येथे नातेवाहीकाचे लग्ना करीता गेले होते व आज दिनांक ०६/०५/२०१८ ला बैतुल येथे हजर असता दुपारी १२.३० वाजता दरम्यान त्यांचे भंडारा येथील नातेवाहीकांनी फोनव्दारे कळविले की त्याचे साई नगर भंडारा येथील घरची चोरी झालेली आहे. म्हणुन फिर्यादी हे बैतुल वरुन भंडारा येथे परत आले असता त्याचे घरा समोरील दाराची कडी व कोंढा तुटलेला दिसला व घर आतुन बंद असल्याचे दिसले व बाजुला दरवाजा उघडा दिसल्याने आत जावुन पाहीले असता कोणीतरी अज्ञात चोराने त्याचे घरातील लॉकर तोडुन त्यामध्ये ठेवलेला सोन्याचा हार वजन २० ग्रॅम, सोन्याचे कानातील झुमके २ वजन १५ ग्रॅम, सोन्याचे कानातील लटकन वजन ५ ग्रॅम, सोन्याचे कानातील रिंग वजन १० ग्रॅम, सोन्याच्या अंगठया ६ नग वजन ३० ग्रॅम, १ सोन्याची चैन वजन १० ग्रॅम, सोन्याची मनगठी वजन २ ग्रॅम, चांदीच्या पायपट्टया वजन २ जोळ व पायजन १ जोळ वजन ५५० ग्रॅम, व नगदी ४२,०००/--रु. असा एकुण २,३९,७५० चा माल चोरुन नेल्याने फिर्यादी रहीमउद्दीन सैयद बसीर वय ६३ वर्ष, रा. साई नाथ नगर तकीया वार्ड भंडारा यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ४५४,४५७,३८० भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. गदादे पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.